अनुवादक(हिंदी) संवर्गातील
बाहययंत्रणेद्वारे भरण्यात आलेल्या पदांच्या
मानधनावर होणाऱ्या खर्चास प्रशासकीय
मान्यता देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
शासन ज्ञापन क्रमांक : भासंनि २०१८/प्र.क्र.१२८/आस्था-२
८ वा मजला, नवीन प्रशासन भवन,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २६ जुलै, २०१९

संदर्भ :-

१) वित्त विभाग, परिपत्रक क्र.पदनि २०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २.१२.२०१३
२) मराठी भाषा, विभाग शासन निर्णय क्र.भासंनि २०१८/प्र.क्र.१२८/आस्था-२, दिनांक २२.२.२०१९.
३) भाषा संचालनालयाचे पत्र क्र. नियुक्ती २०१८/प्र.क्र.१५०/११२९/चौदा, दिनांक ११.७.२०१९

ज्ञापन -

उपरोक्त विषयाबाबत संदर्भ क्र.२ येथील शासन निर्णयान्वये भाषा संचालनालयातील हिंदी अनुवादकांची २ रिक्त पदे बाहययंत्रणेद्वारे भरण्यास मंजुरी देण्यात आलेली आहे. सदर दोन पदांच्या मानधनापोटी दरमहा होणाऱ्या खर्चाच्या एकूण रुपये ५०,०००/- (रुपये २५,०००/- प्रत्येकी) एवढया रकमेच्या खर्चास प्रशासकीय मंजुरी देण्यात येत आहे. सदरचा खर्च मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

२. बाहययंत्रणेद्वारे सेवा घेताना होणाऱ्या खर्चासंबंधात वित्त विभाग परिपत्रक क्र.पदनि २०१३/प्र.क्र.११२/१३/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २.१२.२०१३ मधील तरतूदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

३. सदर मंजुरीचे आदेश वित्तीय अधिकार नियम पुस्तिका,१९७८ भाग-पहिला, उपविभाग-चार मधील अ.क्र. ११ अन्वये प्रशासनिक विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहेत.

४. सदर ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा सांकेतांक क्रमांक **२०१९०७२६१५०७४०६९३३** असा आहे. हे शासन ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

MANGESH PARSHURAM KUDTARKAR

Digitally signed by MANGESH PARSHURAM KUDTARKAR
DN: CN = MANGESH PARSHURAM KUDTARKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = MARATHI LANGUAGE
Date: 2019.07.26 15:49:08 +05'30'

(मं. प. कुडतरकर)
कार्यासन अधिकारी

प्रति,

१) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता),मुंबई/नागपूर.
२) महालेखापाल (लेखा परीक्षा), मुंबई/नागपूर.
३) उपसचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
४) भाषा संचालक, भाषा संचालनालय, मुंबई. (२ प्रती)
५) अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई (भाषा संचालनालयामार्फत)